# पुणे महानगरपालिका
# स्थायीसमिती
# कार्यपत्रिका क्र. ५२
# सभा क्र. ६३, दिनांक २२/३/२०२२ चा वृत्तांत

पुणे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक २२/३/२०२२ रोजी, सकाळी ११.३० (साडेअकरा) वाजता मा.महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका भवन, पुणे येथे संपन्न झाली.

सदर सभेस मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका व नगरसचिव हे उपस्थित होते. तसेच संबंधीत विषयांचे काही खाते प्रमुख उपस्थित होते.

मा. प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थायी समितीचे विषय सादर करण्यात आले, त्यावर मा.प्रशासक तथा आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे निर्णय दिले आहेत.

**विषय क्र.२४७०**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाकडील डिसेंबर २०२१ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उपआयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र उआप–३/१०८५६, दि. ८/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४७१**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाकडील जानेवारी २०२२ चा अहवाल निदर्शनास आणणे बाबत मा.उपआयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र उआप–३/१०८५८, दि. ८/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४७२**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले–पाटीलरोड/ येरवडा–कळस/ नगररोड (वडगांवशेरी ) क्षेत्रीय कार्यालयाकडील फेब्रुवारी २०२२ चा अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उपआयुक्त, परिमंडळ क्र. १यांचे जा.क्र उप–१/८५४०, दि. १०/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात येत आहे.**

## <u>माहितीसाठी आलेले विषय</u>

**विषय क्र. २४७३**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांच्या अंतर्गत असणाऱ्याकामांच्या दि. १६ फेब्रुवारी २०२२ ते दि. २८ फेब्रुवारी २०२२ ची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/१५२६, दि.७/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४७४**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील कामांच्या दि. १६जानेवारी २०२२ ते दि. ३१ जानेवारी २०२२ ची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदाकरार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचेजा.क्र. मआ/प.क्र.५/१५६७, दि.११/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४७५**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांच्या अखत्यारीतील कामांच्या दि. १ फेब्रुवारी २०२२ ते दि.१५ फेब्रुवारी २०२२ ची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदाकरार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचेजा.क्र. मआ/प.क्र.५/१५६८, दि.११/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४७६**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ४ यांच्याअखत्यारीतीलकामांच्या दि. १६ फेब्रुवारी २०२२ ते दि.२८ फेब्रुवारी २०२२ ची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबतजोडल्याप्रमाणे संविदाकरार व तदनुषंगिक माहिती निदर्शनासआणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचेजा.क्र. मआ/परि.क्र.४/१५८८, दि.१४/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात येत आहे.**

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. २४७७**

Collection and Transportation of Municipal Solid waste generated in newly added villages of Sus, Mhalunge, BavdhanBudruk and KondhaveDhavade in PMC and its scientific processing and disposal for a period of One year कामी (RFP निविदा) टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे. प्रकृतीवेस्ट मॅनेजमेंट, मुलखेड, पुणे यांचे एकच टेंडर आले असल्याने खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा. अति. महा.आयुक्त ( इ ) यांचेजा.क्र. मआ/घन.व्यव/१५३६, दि. ९/०३/२०२२ चे पत्र.

१) Collection and Transportation of Municipal Solid waste generated in newly added villages of Sus, Mhalunge, BavdhanBudruk and KondhaveDhavade in PMC and its scientific processing and disposal for a period of One year या कामाकरिता मे. प्रकृतीवेस्ट मॅनेजमेंट, मुलखेड, पुणे यांचीसर्वातकमीदराची निविदाएकूण र.रू.३,१०,२५,०००/- ( GST विरहीत ) पर्यंतकाम करूनघेणेस व त्यांचेबरोबरकरारनामाकरणेस,

२) सदर कामा करिता RE19A148A-BOT/BOOT तत्वावर उभारण्यात आलेल्या प्रकल्पांची टिपिंग फी अदा करणे या अर्थशिर्षकावर झालेल्या कामाचा खर्च करणेस,

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४७८**

इलेक्ट्रीक बाईक रेटींगप्रकल्प (बी-२ पद्धत) कामीटेंडर्स मागविलीअसता मे. व्हिट्रो मोटर्स प्रा.लि. यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून बी २ पद्धतीने Revenue to be shared with PMC-2%, Lump Sum Amount Annually- Rs. 3,00,000=00, Agency Service Charge for E-Bike Renting [INR/Per min.]- RS 1.60 per Minute पर्यंत इलेक्ट्रीक बाईक रेटींग प्रकल्पानुसार ३० वर्षे मुदतीच्या कालावधी करिता प्राप्तदराप्रमाणे संयुक्तप्रमाणे व टेंडर अटी शर्तीप्रमाणे होणारे बदलाप्रमाणे करार करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/१५६४ दि. ११/०३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करण्यात यावा.**

**विषय क्र. २४७९**

पुणे महानगरपालिका शिक्षण विभाग (प्राथमिक) करिता फर्निचर साहित्य पुरविणेकामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. पायल इंडस्ट्रीज, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून निविदा रक्कम रूपये- ४०,५८,२७०=२० (सर्व करांसह) (उपलब्ध तरतुदीस अधीन राहून) पर्यंत मे.पायल इंडस्ट्रीज, पुणे यांचेकडून काम करून घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस, तसेच सदर कामापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/१५९० दि. १४/०३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषय मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४८०**

मा. साईनाथ बाबर यांचे दि. २५/१/२०२२ चे पत्र.

प्रभाग क्र. २७ ड मधील लुल्लानगर चौकातील माणिकचंद मलबार सोसायटी समोरील रस्ता विकसित करणेसाठी र.रू. १ कोटींचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, पान क्र. १८७, बजेटकोड-CE20A1249/A6-211, पुणे शहरातील एच.सी.एम.टी.आर रस्ता विकसित करणे . | १ कोटी | --- |
| नविनसुचविलेलेकाम - | | |
| प्रभाग क्र. २७ ड मधील लुल्लानगर चौकातील माणिकचंद मलबार सोसायटी समोरील रस्ता विकसित करणे | --- | १ कोटी |

(मा.मुख्य सभा मान्यतादेईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनीसदर ठरावाचीकार्यवाहीकरावी.)

**निर्णय : सदरचा विषय दफ्तरी दाखल करण्यात येत आहे.**

**विषय क्र. २४८१**

मा. साईनाथ बाबर यांचे दि. ३१/१/२०२२ चे पत्र.

प्रभाग क्र.२७ ड मधील कोंढवा खुर्द स.नं.१ येथे नव्याने तयार करण्यात येणा–या पुणे महानगरपालिकेची शिवाजी उर्फ आबासाहेब रामचंद्ररोकडे कॉमर्स कॉलेज ईमारत बांधणेसाठी र.रू. १ कोटीचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१–२०२२ चे अंदाजपत्रक, पान क्रं.१८७, बजेटकोड–सीई२०अे१२४९/अे६–२११ पुणे शहरातील एच.सी.एम.टी.आर रस्ता विकसित करणे | १ कोटी | --- |
| **नविनसुचविलेलेकाम** | | |
| प्रभाग क्र.२७ ड मधील कोंढवा खुर्द स.नं.१ येथे नव्याने तयार करण्यात येणा–या पुणे महानगरपालिकेची शिवाजी उर्फ आबासाहेब रामचंद्र रोकडे कॉमर्स कॉलेज ईमारत बांधणे. | --- | **१ कोटी** |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाचीकार्यवाही करावी.)

**निर्णय : सदरचा विषय दफ्तरी दाखल करण्यात येत आहे.**

## संकिर्ण

**विषय क्र. २४८२**

नगररोड वडगावशेरी कार्यालय अंतर्गत पडीक हद्दीचे स्वच्छतेसाठी बिटसनुसार झाडणकाम करणेकरिता मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद अकुशल कंत्राटी कामगार पुरविणेचे काम ठेकेदार मे.साईराज इंडस्ट्रियल सर्विसेस प्रा.लि. यांचेकडून पुर्वगणित टेंडर रक्कमेच्या अॅटपार दराने महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) क अन्वये काम करून घेणेची , त्यासाठी त्यांना वर्क ऑर्डर देऊन त्यांचेशी करारनामा करून घेणेची व ठेकेदारास त्यांची प्रत्यक्ष केलेल्या कामानुसार अॅटपार दराने दिलेल्या र.रू.४,९१,२६,८५५=१८ वेतन अदा केलेबाबतचे व पुढील कायदिश होईपर्यंत वेतनापोटी येणारे बिल ठेकेदार मे.साईराज इंडस्ट्रियल सर्विसेस प्रा.लि. यांना अदा करावे लागणार असलेबाबतची माहिती मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये केलेले कामाची माहिती मा. स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा. महापालिकाआयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र. १/१५९१, दि. दि. १७/०३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदर विषयाची नोंद घेण्यात येत आहे.**

## दाखल विषय

**विषय क्रमांक :– २४८३ त्वर्य**

मा.पदाधिकारी व मा.गटनेते यांचे कार्यालयात तसेच मा.मुख्य सभा, मा.स्थायी समिती सभा, विशेष समिती सभा प्रसंगी मागविणेत आलेल्या चहापान व खाद्यपदार्थ यांचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.नसजा/६७९८, दि.२१/०३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक :– २४८४ त्वर्य**

स्व. राजीवगांधी रूग्णालय येथे नव्याने तयार करण्यात येणाऱ्या कोविडकेअर सेंटर केंद्रा करिता ऑक्सिजन पाईपलाईन व अनुषंगिक कामेकरणेकामे ठेकेदार मे.स्पार्क इंडस्ट्रीज यांचे एकच टेंडर आले (पूर्वगणनपत्रक र.रु. ४९,९८,९१०=१० मधील निविदा र.रु.४२,३८,१९५/–(अधिक प्रचलित दराने येणारा १८टक्के व १२टक्के जीएसटी) च्या ६.११ टक्के कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,७९,२४१=२९ अधिक जीएसटी १८ टक्के व १२ टक्के र.रु. ७,१४,२३५=४१ असे एकूण र.रु. ४६,९३,४७६=६९ पर्यंत काम करुन घेणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस व केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१६०० दि. १७/०३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक :– २४८५ त्वर्य**

रामटेकडी व वानवडी प्रभागात टँकरने पाणी पुरवठा करणे मा. अति.महा.आयुक्त (ज), पुणे मनपा यांचे मआ/पापु/१६०९, दि.२१/०३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक :– २४८६ त्वर्य**

राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळांच्या स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून पुणे शहराच्या नावलौकिकात भर घालणाऱ्या महानगरपालिका हद्दीतील खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती देणेसाठी क्रीडा धारेणातील तरतुदीनुसार कार्यवाही करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/क्रिडा/१६१० दि. २२/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक :– २४८७ त्वर्य**

पुणेपेठ वडगावशेरी, ता.हवेली, जि. पुणे स.नं. ४, हिस्सा नं.२ मधील ग्रामपंचायत हद्दीतील जागा स्मशानभुमी / दफनभूमीसाठी संपादन करणे मा. महा.आयुक्त यांचेजा.क्र. मआ/भुसंपादन/१६१२ दि. २२/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक :– २४८८ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या परिमंडळ क्र. ४ ते क्र. ५ मध्ये असलेल्या एल.जी.पी. गॅस शवदाहिन्यांमध्ये एल.पी.जी. गॅसचा पुरवठा करणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ईस्टेट) यांचे जा.क्र. मआ/ विद्युत/ १६१३/ दि. २२/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक :– २४८९ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या परिमंडळ क्र. १ ते क्र. ३ मध्ये असलेल्या एल.जी.पी. गॅस शवदाहिन्यांमध्ये एल.पी.जी. गॅसचा पुरवठा करणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (ईस्टेट) यांचेजा.क्र. मआ/विद्युत /१६१४/ दि. २२/३/२०२२ चे पत्र.

**निर्णय : सदरचा विषय दाखल मान्य करण्यात येत आहे.**

वरीलप्रमाणे कामकाज होऊन कार्यपत्रिका संपली.

**स्वाक्षरी/–xxx**
**(शिवाजी दौंडकर)**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**दिनांक १९/८/२०२१ रोजी वृत्तांत मंजूर.**

**स्वाक्षरी/–xxx**
**(विक्रम कुमार)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**पुणे महानगरपालिका.**